# भूगोल

## उत्तरे : सराव प्रश्नपत्रिका 5 वी

**प्र. 1.**

(1) भारतातील राज्ये उत्तरेकडून दक्षिणेकडे :

हरियाणा – महाराष्ट्र – कर्नाटक – केरळ

(2) भारतातील प्राकृतिक भूरूपे दक्षिणेकडून उत्तरेकडे :

निलगिरी डोंगर – दख्खनचे पठार – उत्तरेकडील मैदान – हिमालय पर्वत

(3) ब्राझीलमधील राज्ये लोकसंख्या घनतेच्या उतरत्या क्रमानुसार :

रिओ-दी-जनेरिओ – पाराना – पाराईबा – रोराईमा

(4) ब्राझीलमधील प्रदेशातील पावसाचे प्रमाण चढत्या क्रमानुसार :

पॅराग्वे-पॅराना नद्यांची खोरी – ब्राझीलची उच्चभूमी – किनारी प्रदेश – ॲमेझॉन नदीचे खोरे.

**प्र. 2.**

(1) रिओ-ग्रांडे – ब्राझीलमधील बंदर

(2) थरचे वाळवंट – भारतातील विरळ लोकसंख्या असलेला प्रदेश

(3) रोराईमा – ब्राझीलमधील विरळ लोकसंख्या असलेले राज्य

(4) ठाणे – भारतातील रेल्वेस्थानक

**प्र. 3.**

(1) (१) इंद्रप्रस्थ (दिल्ली) (२) मिथिला (३) वाराणसी (४) हडप्पा


(2) (१) पाऊ ब्रासील (२) रबर (३) महोगनी (४) रोझवुड

(3) (१) नोंदवही (२) नमुना प्रश्नावली (३) पेन (४) पेन्सिल

(4) (१) लोहखनिज (२) मँगनीज (३) कोळसा (४) बॉक्साईट

(5) (१) मुंबई (२) दिल्ली (३) कोलकाता (४) चेन्नई.

प्र. 4. (अ)




प्र. 4. (आ)

(1) समताप रेषांचा विचार करता ब्राझीलमधील सरासरी तापमानकक्षा १८° से ते २८° से आहे.

(2) ब्राझीलमधील ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यात जास्त पाऊस पडतो.

(3) ब्राझीलकडे ईशान्य व आग्नेय दिशेने वारे येतात.

(4) ब्राझीलमधील पॅराग्वे-पॅराना खोरे या भागात सरासरी तापमानकक्षा कमी आहे.

(5) ब्राझीलमध्ये ब्राझील उच्चभूमी या भागात सरासरी पर्जन्यमान कमी आढळते.

प्र. 5.

**(1)** (१) ब्राझीलच्या किनारी भागात विषुववृत्ताजवळ सर्वसाधारणपणे तापमानात फारसा फरक पडत नाही.

(२) या प्रदेशात वाऱ्यांचे सातत्याने ऊर्ध्व दिशेने वहन होते.

(३) या प्रदेशातील आंतर उष्णकटिबंधीय एकत्रीकरण विभाग क्षीण स्वरूपाचा असल्यामुळे आवर्त निर्माण होत नाहीत. त्यामुळे ब्राझीलमध्ये उष्णकटिबंधीय वादळे कमी प्रमाणात होतात.

**(2)** (१) ब्राझील हा देश तीन शतकांपेक्षा अधिक काळ पोर्तुगीजांच्या अधिपत्याखाली होता.

(२) विसाव्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात जागतिक वित्तीय समस्यांमधून हा देश सावरला आहे.

(३) भविष्यातील एक प्रमुख बाजारपेठ या दृष्टीने ब्राझीलकडे पाहिले जाते. अशा प्रकारे, जगाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारा देश म्हणून ब्राझीलकडे पाहिले जाते.

**(3)** (१) मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खासगी क्षेत्रांचे सह-अस्तित्व असते.

(२) भारतात व ब्राझीलमध्ये रेल्वे, विद्युतनिर्मिती, लोह व पोलाद उद्योग इत्यादी क्षेत्रांतील साधनांची मालकी व व्यवस्थापन यांवर प्रामुख्याने शासनाचे नियंत्रण आहे.


(३) भारतात व ब्राझीलमध्ये बँका, विमान वाहतूक, आरोग्य, शिक्षण, दूरसंचार इत्यादी क्षेत्रांतील साधनांची मालकी व व्यवस्थापन खासगी उद्योजक व शासन यांत विभागलेले आहे. अशा प्रकारे, भारत व ब्राझील या दोन्ही देशांमध्ये मिश्र अर्थव्यवस्था आहे.

**(4)** (१) जलमार्ग हा वाहतुकीचा सर्वांत स्वस्त मार्ग आहे. त्याचप्रमाणे, जलवाहतुकीत वाहतूक क्षमता तुलनेने अधिक असते.

(२) आंतरराष्ट्रीय व्यापारात मोठ्या प्रमाणावर वस्तूंची आयात व निर्यात केली जाते.

(३) आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सागरी मार्गांचा वापर केला असता, कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर वस्तूंची आयात व निर्यात करता येते. म्हणून, आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सागरी मार्गांवर अवलंबून राहावे लागते.

**प्र. 6. (अ)**




(1) भारताची २०१७ ची नागरी लोकसंख्येची टक्केवारी ३२.८% आहे.

(2) ब्राझील देशाची नागरी लोकसंख्येची टक्केवारी जास्त आहे.

(3) ब्राझीलमध्ये नागरी भागात राहणाऱ्या लोकांची टक्केवारी अधिक आहे. पण ती फार काही वाढत नाही; याउलट भारतात नागरी भागात राहणाऱ्या लोकांची संख्या कमी आहे; पण ती ब्राझीलपेक्षा अधिक दराने वाढत आहे.

**प्र. 6. (आ)**

(1) १९९५ साली भारतात अधिक परदेशी पर्यटक आले.

(2) २००० साली ब्राझीलमध्ये अधिक परदेशी पर्यटक आले.

(3) २०१० या वर्षापासून भारतामधील परदेशी पर्यटकांची संख्या वाढलेली दिसते.

(4) २०१५ साली ब्राझीलमधील परदेशी पर्यटकांची संख्या सुमारे ६० लाख आणि भारतातील परदेशी पर्यटकांची संख्या सुमारे १३० लाख होती.

(5) २००५ ते २०१० या कालावधीत ब्राझीलमधील परदेशी पर्यटकांची संख्या कमी झाल्याचे आढळते.

(6) पर्यटन व्यवसायासंबंधी व्यावसायिक दृष्टिकोन व परदेशी पर्यटकांना दिल्या जाणाऱ्या सुविधांतील वाढ हे २०१० नंतर भारतातील परदेशी पर्यटक मोठ्या प्रमाणावर वाढण्यामागचे कारण असावे.

**प्र. 7.**

**(1)** एखाद्या ठिकाणास प्रत्यक्ष भेट देऊन तेथील भौगोलिक व सांस्कृतिक घटकांची माहिती मिळवणे म्हणजे 'क्षेत्रभेट' होय.

क्षेत्रभेटीसाठी आम्ही पुढील साहित्य घेऊ :

(१) माहितीची नोंद करण्यासाठी नोंदवही, पेन, पेन्सिल, मोजपट्टी, कॅमेरा, दुर्बीण इत्यादी.

(२) स्थानाच्या दिशा निश्चितीसाठी होकायंत्र व सखोल अभ्यासासाठी नकाशे.

(३) क्षेत्रभेटीच्या हेतूनुसार माहिती संकलनासाठी नमुना प्रश्नावली.

(४) क्षेत्रातील पाण्याचे, मातीचे, कचऱ्याचे, वनस्पतींचे, दगडांचे नमुने गोळा करण्यासाठी कागदी पिशवी अथवा बंद झाकणाचे डबे. याशिवाय, टोपी, पाण्याची बाटली, प्रथमोपचार पेटी इत्यादी.

**(2)** ब्राझील व भारतातील वनांचा ऱ्हास होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत :

(१) भारत व ब्राझील या दोन्ही देशांत वाढत्या लोकसंख्येला निवासासाठी जागा अपुरी पडत आहे.

(२) निवासासाठी जागा उपलब्ध व्हावी यासाठी दोन्ही देशांत मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली जातात.

(३) ब्राझीलमध्ये 'रोका' व भारतात 'झूम' यांसारख्या स्थलांतरित शेतीसाठी वनांखाली असलेली जमीन वृक्षतोड करून किंवा जाळून शेतीसाठी व अधिवासासाठी मोकळी केली जाते.

(४) लोकांच्या इंधनाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वनांतील झाडे तोडली जातात.

**(3)** दक्षिणेकडून उत्तरेकडे भारतीय हवामानात होणारे बदल पुढीलप्रमाणे आहेत :

(१) भारतात दक्षिणेकडून उत्तरेकडे जाताना तापमानात घट होत जाते.

(२) **उदा.,** दक्षिणेकडील द्वीपकल्पीय प्रदेशातील बहुतांश भागात सरासरी तापमान २५°से ते ३०°से असते. याउलट उत्तरेकडील पर्वतीय प्रदेशातील बहुतांश भागात सरासरी तापमान ५°से ते १०°से असते.

(३) भारतात दक्षिणेकडून उत्तरेकडे जाताना पर्जन्यमानातही घट होत जाते.

(४) **उदा.,** दक्षिणेकडील चेन्नई या ठिकाणी नोव्हेंबर महिन्यातील सर्वाधिक पर्जन्याचे प्रमाण सुमारे ४१० मिमी असते. याउलट, उत्तरेकडील दिल्ली या ठिकाणी ऑगस्ट महिन्यातील सर्वाधिक पर्जन्याचे प्रमाण सुमारे २५० मिमी असते.

---

❀❀❀